बचत गट गीत

गटाने मिळून कार्य आता करा गं,
या देशाची धूरा खांद्या वरती धरा गं ॥धृ॥
महिलांनी केला गट हा उभा,
स्वतंत्र विचारा मिळाली मूभा
स्वतःच्या हाताला फुटू द्या पैशाचा झरा गं
या देशाची धूरा खांद्या वरती धरा गं ॥१॥
हातात तुमच्या सरकारं आलं
महिला सरपंच गावात झालं
एकीच्या जुटीनं गावासाठी झटा गं
या देशाची धूरा खांद्या वरती धरा गं ॥२॥
तुझ्यावर अन्याय इथेच झाले
अबलेचे रुपांतर सबलेत केले
स्वतःची सुटका स्वतःच आता करा गं
या देशाची धूरा खांद्या वरती धरा गं ॥३॥

समता विज्ञान आंदोलन



बचत गटांविषयी केंद्र सरकारने एक नवे विधेयक आणले आहे. या 'लघु वित्त क्षेत्र विकास' विधेयकात आहे तरी काय? गेली दहा-पंधरा वर्षे संघर्ष करून आपण उभे केलेले गट व त्यांची फेडरेशन्स याना हे विधेयक मदत करणार आहे का अडचणीत आणणार? गटातील महिलांना स्वावलंबन व स्वातंत्र्य देणार की मध्यस्थ संस्थांचे वर्चस्व वाढवणार व बँकांशी जखडून टाकणार? गावागावातील या गटांची सामाजिक - राजकीय क्षेत्रातील आगेकूच पुढे जाणार की थांबणार? अत्याचार, हिंसा, शिक्षण, तंत्रज्ञान, कौशल्ये, बाजारपेठ, जमिन-पाणी-घर यावरील हक्क आणि महिला नेतृत्त्व याबाबतची लढाई पुढे न्यायला हा कायदा मदत करणार का? या दृष्टीने हे विधेयक काय म्हणते? या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्याआधीच त्यावरची आपली प्रतिक्रिया दिल्ली पर्यंत पोचवू या. त्यासाठीच तर आहे हे पुस्तक ...

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

बचत गटासंबंधी नवा कायदा





भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : बचत गटासंबंधी नवा कायदा
लेखक :सम्राट शिरवळकर
अंजना टकले
संपादक: विनया मालती हरी

मुखपृष्ठ: प्रतिभा साळुंके
मलपृष्ठ: पाणी धोरणांचा आढावा व पर्याय
या पुस्तकातून साभार

जवाआं/म ७२ (प्रथमावृत्ती)
प्रकाशन : जुलै, २००७

देणगी मूल्य : १५ रुपये

© भारत ज्ञान विज्ञान समुदाय

अक्षर जुळणी : सुनिता जगदाळे

महिलांना, खेड्यापाड्यातील आणि निरक्षर तसेच शिक्षित महिलांना प्रत्येक क्षेत्रात निर्भयपणे वावरता यावे, ज्ञान-विज्ञान युगात त्यांची आगेकूच वेगाने व्हावी आणि स्त्री-पुरूष समानता प्रत्यक्षात यावी यासाठीचे हे समता विज्ञान आंदोलन. नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समुदायतर्फे चालवल्या जात असलेल्या 'समता विज्ञान आंदोलना'चे प्रकाशन

प्रकाशक :
सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय
९, आधार अपार्टमेंट,
३०५,नारायण पेठ,
पुणे-४११०३०
फोन व फॅक्सः ०२०-२४४३४१३३
ईमिल: mahabgvs@sancharnet.in

मुद्रण स्थळ :
एम आर अँड कंपनी, पुणे-३०
संपर्क : ९८२२८४३१३८

बचत गटासंबंधी नवा कायदा



भारत ज्ञान विज्ञान समुदाय



अनुक्रम

बचत गट कशासाठी ?:
विनया मालती हरी । ३

लघुवित्त क्षेत्र (विकास आणि नियमन) विधेयक :
मराठी भाषांतर/सम्राट शिरवळकर । १०

विधेयकाबाबतची योग्य भूमिका :
अंजना टकले/विनया मालती हरी । २८

बचत गट चळवळ : कशासाठी?

बचत गटांसंबंधी केंद्र सरकार एक नवा कायदा आणत आहे. लघुवित्त क्षेत्र (विकास आणि नियमन) विधेयकाची अर्थमंत्री श्री. चिंदबरम यांनी नुकतीच संसदेत मांडणी केली. या विधेयकाचा आपल्या बचत गटांशी, महिलांशी, आपल्या विकासाशी नेमका काय संबंध आहे? त्याचे कोणते बरेवाईट परिणाम होऊ शकतील? असे काही प्रश्न आहेत. त्यांचा विचार करायचा तर बचत गट चळवळीचे आजचे चित्र/स्वरूप प्रथम समोर ठेवले पाहिजे.

भारतभर व महाराष्ट्रातही हजारो-लाखो बचत गट आज कार्यरत आहेत. कोट्यवधी गरीब, कष्टकरी आणि धडपडणाऱ्या महिला यामध्ये आज गुंतलेल्या आहेत- एका आशावादाने. रुपया-रुपया जोडून चार पैसे जमवावे आणि आपले जगणे चांगले बनवावे या इच्छेने. अंगणवाडी व प्राथमिक शिक्षक, पंचायत सदस्य, शहरातील वस्त्यांमध्ये नगर सेवक त्यांच्या संस्थांमार्फत, खाजगी, सहकारी व ग्रामीण बँका, अगदी मक्तेदार व्यापारी बँका ते जागतिक बँकेपर्यंत सर्वजण वेगाने बचत गटाच्या या कामात गुंतले आहेत. आपल्या देशात २०-२५ वर्षांपूर्वी बचत गटांना सुरुवात झाली आणि आज लाखो गटांमधून करोडो महिला एकत्र बांधल्या गेल्या आहेत. विविध विभागात रोज नवीन गटांची उभारणी होत आहे. आदिवासी पाड्यापासून ते शहरातील निम्न मध्यम स्तरांपर्यंत हे जाळे विस्तारले आहे. त्यांची ताकद, त्यांचा फायदा दिसायला लागल्यामुळे आता शेतमजूर-कारागीर-कामगार-युवक यांचेही गट बनू लागले आहेत.

महिलांचे गट आता कर्जे देवघेव, उत्पादने-विक्री-व्यवसाय, सार्वजनिक स्वच्छता, स्वत:चे आरोग्य, दूध सोसायट्या,'पाणी-योजना, राजकारण याबाबत बोलू लागल्या आहेत. दारूबंदी, अत्याचार या विरुद्ध आवाज उठवू लागल्या आहेत. स्वत:चे श्रम हलके करण्यासाठी त्यांनी विज्ञान-तंत्रज्ञानाची कौशल्ये

हस्तगत करायला व मदत घ्यायला सुरूवात केली आहे. घरगुती उद्योगाला बाजारपेठ मिळवण्यासाठी शहरांपर्यंत काही गटांची धाव पोचली आहे. एवढेच नव्हे तर ग्रामसभा, पंचायत समित्यांमधून धिटाईने त्या आपली बाजू मांडायला लागल्या आहेत. स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक होताहेत.

बचत गट : का वाढताहेत?

एकतर आपल्या देशात प्रचंड गरिबी आहे. सरकारची दारिद्र्यरेषा जरी २५ कोटी लोक दारिद्र्यात आहेत असे सांगत असली तरी देशातील निम्म्याहून अधिक म्हणजे ५० कोटीपेक्षा जास्त लोक हालाखीत, गरिबीत जगत आहेत. अशा लोकांना विशेषतः ग्रामीण गरिबांना आर्थिक आधाराची गरज असते. त्यांना रोजच्या जगण्यासाठी काहीतरी मार्ग काढावाच लागतो. बुडत्याला काडीचा आधार ! आणि मग बचत गटाची कल्पना त्यासाठी उपयोगी पडली. म्हणूनही या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून बचतगटांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळला असावा.

सर्वस्व हरवलेल्या महिलांना काहीतरी आर्थिक साधन हवे होते. सर्वांगाने कोंडी झालेल्या महिलांनी एकत्र येण्याचे साधन म्हणून त्याकडे पाहिले आणि त्या मोठ्या प्रमाणावर गटांमधून सामूहिक व्यवहार करू लागल्या.

सरकारने पुढाकार घेऊन ही कल्पना उचलून धरली व पसरवली. आजही सरकार ते करते आहे. पण यातली 'अंदरकी बात' वेगळीच आहे. गरिबी हटवणे ही सरकारची जबाबदारी आहे हे पूर्वीपासून सर्वमान्य आहे. परंतु सरकार गरिबी हटविण्याची, रोजगार निर्मितीची आपली जबाबदारी आता टाळत आहे. कल्याणकारी विकासाचा मार्ग सोडून 'ज्याचे त्याने स्वतः पाहावे' अशी भूमिका सरकार हळूहळू घेत आहे. गरीबी, रोजगार निर्मिती अशा साऱ्याला एक पर्याय म्हणून असे गट वाढावेत या प्रयत्नात सरकार आहे.

यात आणखीही मंडळी आहेत, त्यांना व्यापारात व बाजारपेठ वाढविण्यात रस आहे. लोकांना बचत करायला लावून व त्या आधारे कर्ज देऊन थोडी क्रयशक्ती वाढवून आणि त्यांना गिऱ्हाईक बनवून, बाजारपेठी आणि चंगळवादी संस्कृती वाढवली जातआहे. या रीतीने बऱ्या-वाईट गोष्टींचा उपभोग वाढवला जातो आहे. उपभोग वाढायला हरकत नाही. पण उपभोग कशाचा? उत्पादन कसले? आणि हित कोणाचे, कंपन्यांचे की गरीब लोकांचे? का महिलांचे? असे अनेक प्रश्न यातून पुढे येत आहेत.

गरीब थरातील लोकांचा बचत गटांना वाढता पाठिंबा बघून राजकीय,

सामाजिक क्षेत्रातील शक्तीदेखील पुढे येत आहेत. त्यांना यात 'जनाधार', राजकीय पाया मिळवण्याच्या संधी दिसू लागल्या आहेत. तसेच काहींना यात आर्थिक कमाई देखील दिसू लागली आहे. म्हणूनच आता राजकीय पुढाऱ्यांच्या, लोकप्रतिनिधींच्या संस्था, स्वयंसेवी संस्था, काही सामाजिक संघटना व चळवळींनी देखील यात लक्ष घालायला सुरुवात केली.

बचत गटांमागील भूमिका व उद्दिष्ट्ये

अशा विविध संस्थांनी विविध क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या भूमिका घेऊन गट बांधण्यास सुरुवात केली. सर्वसाधारणपणे आज अस्तित्वात असलेल्या गटांच्या भूमिका व उद्दिष्ट्ये अशी सांगता येतील.

(१) ज्यांची पत नाही अशा गरीबांना, विशेषतः महिलांना बँका कर्ज देत नाहीत. अशांना कर्ज देऊन तातडिची आर्थिक मदत मिळवून देणे. विविध प्रशिक्षण देणे यातूनच त्यांची गरिबी दूर होईल व सामाजिक असंतोषही हळूहळू कमी होईल. या विचारातून बांधलेले गट.

(२) बचतगटातून महिलांना सरकारी योजनांची माहिती देणे व आर्थिक मदतीच्या आधारे त्यांची उन्नती करणे.

(३) इतरांचे बघून (आपल्या भावकीतल्या लोकांना घेऊन) गट तयार होत आहेत. त्यामागे खास, वेगळा असा सामाजिक उद्देश नाही, तर अडीअडचणींना एकमेंकांना मदत होईल असा मर्यादित विचार यामागे आहे. एखाद्या गावापुरते किंवा ठरावीक पंचक्रोशी पुरते हे गट तयार होताना दिसतात.

(४) सहकारी तत्त्वावर महिलांना (सर्वसामान्यांना) एकत्र येण्यासाठी प्रवृत्त करणे. त्यांच्या हक्कांविषयी, सामाजिक आर्थिक परिस्थिती विषयी जागृती करणे, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता निर्माण करणे व स्वावलंबनासाठी सामूहिक निर्णयप्रक्रियेद्वारे लोकशाही बळकट करणे, विकास प्रक्रियेला वळण देणे, सामाजिक परिवर्तनासाठी महिलांना क्रियाशील करणे या विचारांनी बांधलेले गट.

काय साध्य होत आहे? कमाई काय?

सर्व गटांचा उद्देश महिलांना (सर्वसामान्यांना) आर्थिक मदत उभी करणे हे आहे. याच्याबद्दल दुमत नाही. तसेच या गटांना सरकारी योजनांची इतरही आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे व विविध प्रशिक्षण देणे याबद्दलही दुमत नाही. परंतु केवळ योजनांची, कायद्याची, हक्कांची माहिती देणे पुरेसे होणार नाही.

तसेच आपल्या भावकीपुरते, गावापुरते छोटे गट काढून त्यावर समाधान मानणे हेही बरोबर होणार नाही. त्याच्या मर्यादा आपण ओळखायला हव्यात. कारण यातून गरिबी व कर्जबाजारीपणा दूर होणार नाही.

सामूहिक बचत करून आज आपण पत निर्माण केली. बँकांकडून कर्ज मिळायला सुरुवात झाली. तरी कर्ज हे केवळ तात्पुरती नड भागवणारी बाब आहे, हे लक्षात घ्यायला हवे. जशी सावकाराच्या पाशातून गटांनी सुटका करून घेतली तशी कर्जातून कायमची सुटका कशी करून घेणार, आपण स्वावलंबी कसे होणार याचा विचार करायला हवा. आणि आज विविध बँका, अगदी जागतिक बँक सुद्धा या गटांना कर्ज देऊन उचलून का धरत आहेत? एकीकडे ग्रामीण अर्थव्यवस्था कुंठीत होत चालली आहे. ती कोसळत गेली तर नुसत्या कर्जाच्या आधारे शेतकरी, दूध सोसायट्या, छोटे कारागीर, विशेषत: महिला हे कसे उभे राहणार? कधी स्वावलंबी होणार? आणि मग आपली बचत, बँका, व्यापारी, उद्योग, शहरे यांच्या उपयोगासाठी तर नाही ना? त्यासाठी तर या बँका गटांना उचलून धरत नाहीत ना असे काही प्रश्न पुढे आले आहेत.

अशा सर्व परिस्थितीचा, सरकारच्या विविध धोरणांचा आणि एकंदर विकासक्रियेचा परिणाम आपल्या जगण्यावर व गटांवरही काय होतो हे तपासले पाहिजे. त्या आधारेच महिला स्वत:चा निर्णय घ्यायला सक्षम होतील. स्वावलंबनाचा खऱ्या मार्गाकडे त्या आगेकूच करतील.

बचतगटांची परिणामकारकता कशी तपासावी?

एकूण उद्दिष्टे आणि दूरपल्ल्याची धोरणे लक्षात घेता कोणती कार्यपद्धती बचतगटांना उपयुक्त आहे? सध्या याबाबतीत वेगवेगळे गट, वेगवेगळ्या पद्धतीनी कार्यरत आहेत. पण खरे पाहता ही कार्यपद्धती खालील निकषांवर तपासून घेतली पाहिजे. त्यांच्यात सामूहिक प्रक्रिया कशी घडवली जाते हे महत्त्वाचे. या कार्यपद्धतीसाठी खालील काही गोष्टी गटात होतात का पाहता येईल.

- सर्व जाती-धर्म-भाषेच्या महिला गटात एकत्र येतात का?कोणत्याही एका जातीचे, भाषेचे, धर्माचे वर्चस्व गटात होत नाही ना? सर्वांना बोलण्याची, कर्जाची समान संधी मिळते ना?हे पाहायला हवे.
- बचतगटाची बैठक ही गाणी, ओव्या, पोवाडा तसेच चळवळीची गाणी अशा आनंददायी वातावरणात घेण्यात यावी.
- महिलांना येणाऱ्या अडचणी, शिक्षण-रेशन-कौटुंबिक जाच याची देवाण-

घेवाण व्हायला हवी.

- बचत गटांची बैठक प्रत्येक आठवड्याला किंवा किमान महिन्यातून दोन वेळा झाली पाहिजे.
- बचतगटाच्या बैठकीत गटाचे आर्थिक हिशोब सर्वांसमोर मांडले गेले पाहिजेत.
- बँकेत जमा केलेले पैसे, दिलेले किंवा द्यावयाचे कर्ज, परतफेड याविषयीचा बचत गटांचा हिशोब हा पारदर्शक असला पाहिजे.
- बचत गटाच्या बैठकीचा इतिवृत्तांत हा प्रत्येक वेळी लिहिला पाहिजे.
- बचतगटात झालेल्या चर्चेवरील नोंदी ह्या बैठकीच्या शेवटी वाचून दाखवावा.
- महिलांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण केले पाहिजे.

हे सर्व आपल्या बचतगटामध्ये होते का? पारदर्शी आर्थिक व्यवहार, एकमेकींच्या सुख-दु:खाची देवाणघेवाण व विविध प्रश्नांवर सामूहिक चर्चा याशिवाय एकी तयार होणार नाही. विश्वासार्हता व गट कायमस्वरूपी टिकण्यासाठी हे आवश्यक आहे. ज्या गटात अशा पद्धतीने कार्य चालते ते पुढे जाताना दिसतात. नाहीतर गटांची मोडतोड होणे, पैसे जमा करून पळून जाणे, व्यक्तिगत व्यवहारामुळे अविश्वास निर्माण होणे असेही होताना दिसते. त्यातून बचतगट मोडून पडतात. मूळ उद्दिष्टे बाजूला पडतात.

तुम्ही कसे गट चालवता? असे गट मोडून पडायचे नसतील, तर तुम्ही काय उपाय कराल? काही वेगळा पर्याय सूचवू शकता?

ज्ञान विज्ञान चळवळीचा अनुभव

बचत गटांमुळे महिलांचा आत्मविश्वास वाढतो व स्वतंत्रपणे त्या उभ्या

राहतात असा ज्ञान विज्ञान चळवळीचा अनुभव आहे. बचत गट जसा आर्थिक तातडीच्या मदतीसाठी आहे त्याहीपेक्षा जास्त तो जागृती घडवण्यासाठी, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, रोजच्या जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी आहे. या उद्देशाने व वरीलप्रमाणे कार्यपद्धती ठेवल्यामुळे महिलांची प्रगती होते असा अनुभव आहे. २१ राज्यात २५,००० हून जास्त बचत गट भारत ज्ञान-विज्ञान चळवळीने समता विज्ञान आंदोलन उपक्रमाद्वारे संघटित केले आहेत. जिल्ह्यांमध्ये गटांची फेडरेशन्स स्वावलंबी पध्दतीने व स्वायत्तपणे कार्य करताना दिसतात. त्याच बरोबर पुरुषांच्या बरोबरीने, नव्हे जास्तच प्रमाणात इतरही कार्यक्रमात महिला सहभागी होताना दिसतात.

या गटातील महिलांनी केलेली कामगिरी थोडक्यात अशी -

- ❖ मासिक वार्तापत्रे काढली.
- ❖ वाचनालये व वाचनचळवळ उभी करण्यात गावात सहकार्य केले.
- ❖ आरोग्य जागृती मोहिम घेतली.
- ❖ परसबागेची अंमलबजावणी.
- ❖ बचत गटामुळे गावात वीज आली, गिरणी आली.
- ❖ बालविज्ञान क्लब (मंच)ची सुरुवात.
- ❖ गावात दारूबंदी केली.
- ❖ मुलाच्या व बायकोच्या नावावर मालमत्ता करण्यास बचतगट सभासदांनी (सभासद महिलेच्या नवऱ्याला) भाग पाडले.
- ❖ आंतरजातीय विवाहासाठी मदत व प्रोत्साहन दिले.
- ❖ लैंगिक विषमता, संस्कृती याविषयावर स्त्रिया धिटाईने बोलू लागल्या.
- ❖ साबणाचे प्रशिक्षण घेऊन व्यावसायिक कंपन्यांच्या तोडीचा साबण तयार केला व हिंदुस्तान लिव्हर सारख्या परदेशी कंपनीच्या विक्रीवर परिणाम केला. अन्य स्थानिक उत्पादनासाठी व त्याच्या व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण घेऊन तयार होत आहेत. देशाचा व स्वत:चा स्वावलंबी विकास व्हावा म्हणून झटत आहेत.
- ❖ खाजगी कंपन्यांच्या विरोधात रास्तारोको/निदर्शने केली.
- ❖ स्थानिक प्रश्नांवर चर्चा आणि अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा.
- ❖ रेशन दुकानाच्या तक्रारी संदर्भात कलेक्टर कचेरीत तक्रार नोंदणी.
- ❖ पंचायती व ग्रामसभेत सहभाग.
- ❖ ग्रा. पं. सदस्य-सरपंच, जिल्हा परिषद सदस्य-अध्यक्षच इतकेच नव्हे तर काही राज्यात महिला कार्यकर्त्या आमदारही झाल्या.

- ❖ २०-३० दिवस चालणाऱ्या राज्यव्यापी/देशव्यापी कलाजत्थ्यात, महिलांनी गाणी-नाटक रचणे व ती करणे यासाठी सहभाग घेतला.
- ❖ गाव पातळीवरच्या महिला विविध चर्चासत्रांमधून, प्राध्यापक-अधिकारी यांच्या बरोबर चर्चा करू लागल्या.
- ❖ सरकारची धोरणे समजावून घेऊन, अधिकाऱ्यांशी संवाद करू लागल्या.

या प्रक्रियेचा भाग म्हणूनच बचत गटासंबंधी नव्याने तयार केलेल्या विधेयकासंबंधी एक कार्यशाळा झाली. त्यात गटातील महिलांनी आपापल्या प्रतिक्रिया नोंदवल्या. सरकारबरोबर कायद्यातील त्रुटींची चर्चा केली. या कार्यशाळेत आलेले मुद्दे आपल्या माहितीसाठी येथे देत आहोत.

नवे आलेल्या या ''लघुवित्त क्षेत्र विकास व नियमन'' विधेयकाचा आपल्या बचत गटावर व ज्या भूमिकेने, उद्देशांनी गट बांधले जात आहेत त्यावर आणि त्याच्या कामावर, निर्णयावर थेट परिणाम होणार आहे. म्हणूनच कायद्यातील उपयुक्त तरतुदी कोणत्या? गोंधळ निर्माण करणाऱ्या कोणत्या? आणि घातक कोणत्या? याचा विचार सर्वांनी करायला हवा.

हा कायदा, सरकारची आर्थिक-शेती व उद्योगाबाबतची विविध धोरणे व आजूबाजूचे बदल लक्षात घेऊन बचतगटांनी आपल्या भूमिका व अनुभव तपासले पाहिजेत. त्यात योग्य ते बदलही करायला हवेत आणि हे बदल केवळे सरकारी कायद्याला उचलून धरण्यापुरते उपयोगाचे नाही, तर बचतगटांचा जो मूळ उद्देश आहे - महिलांचा स्वावलंबी विकास व त्यांचे सक्षमीकरण, याची दिशा कशी बळकट होईल हे पाहिले पाहिजे. त्यात या कायद्याचा किती व कसा उपयोग होईल तो करून घ्यायला हवा.

आव्हान आहे, संधी आहे पण धोके आहेत. परिवर्तनाची दिशा पक्की ठेवताना बचत गट चळवळ पुढे न्यायची आहे. तिची सांगड अन्य चळवळींशी घालायची आहे. त्यादृष्टीने आत्ता आलेला हा कायदा 'लघुवित्त क्षेत्र व नियमन' आपल्या गटाच्या कामकाजाशी सरळ संबंधित, याबद्दल माहिती घेऊ या. आपली मते नोंदवू या.

- विनया मालती हरी

❑

लघुवित्त क्षेत्र (विकास आणि नियमन) विधेयक

(४१वे विधेयक २००७)

प्रस्तावना

शहरांमधील व ग्रामीण लघुवित्त क्षेत्रामध्ये वाढ व्हावी आणि त्याचा विकास व्हावा, तसेच अशा गटांद्वारे महिला व इतर उपेक्षित घटकांना आर्थिक सेवांचा लाभ घेण्यास सुयोग्य वातावरण निर्माण व्हावे, अशी तरतूद या विधेयकात आहे. त्याच्या परिणामी अशा भौगोलिक क्षेत्रांचाही विकास होण्यास मदत होईल आणि आजपर्यंत कोणत्याही कायद्याच्या नियंत्रणाबाहेर राहिलेले बचत गटांचे कार्य नियंत्रित केले जाईल.

ओळख

(१) कायद्याचे नाव

१) हा कायदा लघुवित्त क्षेत्र (विकास आणि नियमन) कायदा, २००७ म्हणून ओळखला जाईल.

२) केंद्र सरकारच्या सूचनेनुसार अधिकृत सरकारी पत्रकात (गॅझेट मध्ये) नोंद झाल्या दिवसापासून हा कायदा लागू होईल.

कायद्यातील काही तरतुदी या निरनिराळ्या तारखांपासून लागू होऊ शकतात. या तरतुदींसंबंधीची सविस्तर माहिती, तरतुदी लागू करण्याच्या वेळी दिली जाईल.

(२) व्याख्या

या कायद्यानुसार -

(ए) 'सहकारी संस्था' म्हणजे नाबार्ड किंवा राज्यांमधील इतर कोणत्याही सहकारी कायद्यांतर्गत नोंदविलेल्या परस्पर-साहाय्य अथवा परस्पर-हित या

तत्त्वावर चालणाऱ्या सहकारी संस्थांचा समावेश होतो.(नाबार्ड कायदा १९८१ च्या प्रकरण २ व बहुराज्य सहकारी संस्था कायदा, २००२ अंतर्गत येणाऱ्या संस्था)

(बी) स्वयंसाहाय्यता गटाची सभासद किंवा प्रत्यक्ष स्वयंसाहाय्यता गट किंवा खाली दिलेल्या वर्गांपैकी या उद्देशासाठी कार्य करणारा कोणताही गट हा लघुवित्त सेवा योजनांचा 'पात्र लाभार्थी' म्हणून ओळखला जाईल.

विधेयकानुसार लाभार्थी असलेले गट/व्यक्ती या पुढीलप्रमाणे -

i) दोन एकरापेक्षा कमी शेतजमीन धारक शेतकऱ्यांचे गट,

ii) शेतजमीन अथवा मैखिक कराराने नांगरट करणाऱ्या वंचित शेतकऱ्यांचे किंवा भाडे तत्त्वावर शेती करणाऱ्या किंवा उत्पादनातील वाटा घेणाऱ्या शेतकऱ्यांचे गट,

iii) भूमिहीन शेतकऱ्यांचे आणि स्थलांतरीत मजुरांचे गट,

iv) कारागीर, लघुउद्योजक आणि इतर तुटपुंज्या किंवा नगण्य अशा भांडवलावर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींचे गट,

v) महिला,

vi) अशा प्रकारचे इतर वंचित गट,

(सी) 'वित्तीय साहाय्य' म्हणजे कोणत्याही प्रकारचे कर्ज, आगाऊ रक्कम, अनुदान, जामिन किंवा इतर कोणत्या स्वरूपात तारण घेऊन अथवा न घेता दिलेले रोखीतील साहाय्य किंवा वस्तू रूपात केलेले साहाय्य.

(डी) 'गट' म्हणजे - लाभार्थी असलेल्या व्यक्तींची संख्या किंवा गट, असे स्वयंसाहायता गट किंवा इतर कोणत्याही नावाने झालेले गट ज्यांचा उद्देश गटातील सभासदांस अल्प बचत अथवा लघुवित्त सेवा पुरविणे हा आहे.

(इ) 'लघुवित्त संस्था' म्हणजे - लघुवित्त सेवा पुरवण्याव्यतिरिक्त इतर व्यवसाय करणाऱ्या संस्था या 'लघुवित्त संस्था' म्हणून ओळखल्या जातील. ज्यामध्ये पुढील संस्थांचा समावेश करता येईल.

i) संस्था नोंदणी कायदा १८६०च्या अंतर्गत नोंद झालेल्या संस्था किंवा राज्यातील इतर संस्था नोंदणी नियमानुसार कार्यान्वित संस्था.

ii) न्यास नोंदणी कायदा १८८२ अंतर्गत किंवा सार्वजनिक, धार्मिक किंवा धर्मादाय उद्देशाने नोंदणी करण्यात आलेला सार्वजनिक न्यास.

iii) सहकारी संस्था किंवा परस्पर मदतीसाठी राज्यातील सदर नोंदणी कायद्यानुसार नोंद झालेल्या परस्पर साहाय्य संस्था किंवा बहुराज्य

सहकारी संस्था (कायदा २००२नुसार नोंद झालेल्या).

ज्यामधून पुढील संस्था वगळण्यात आल्या आहेत.

अ) बँक कायदा १९४९ [कलम ५ (cci)] खाली नोंदवलेल्या सहकारी बँका.

ब) कृषी अथवा औद्योगिक क्षेत्राशी निगडीत उद्योग, खरेदी-विक्री, इतर सेवा पुरवणारी कोणतीही सहकारी संस्था.

(एफ) 'लघुवित्त सेवा' म्हणजे

i) खाली दिलेल्या १ ते ४ उपनियमातील कोणत्याही व्यक्तीस अथवा पात्र लाभार्थीस, प्रत्यक्ष किंवा गटाद्वारे पुढील कारणाने दिलेले वित्तीय साहाय्य:

अ) लघु उद्योग, शेती व इतर संबंधित कामांसाठी ५०,००० रुपयांपर्यंतचे साहाय्य. (यामध्ये व्यक्तिगत उपभोगासाठी घेतलेले साहाय्यदेखील अंतर्भूत आहे) किंवा,

ब) व्यक्तीला १,५०,००० रू. पर्यंत घरासाठीचे अर्थसाहाय्य किंवा,

क) अ आणि ब मध्ये नोंदवलेल्या इतर कोणत्याही कारणासाठीचे अर्थसाहाय्य.

ii) रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत मध्यस्थ संस्था, शेड्युल्ड बँकांच्या माध्यमातून पात्र लाभार्थिस १ ते ४ प्रमाणे मिळणारे अर्थसाहाय्य.

iii) अधिकृत संस्थांनी मान्यता दिलेल्या आयुर्विमा योजना, सर्वसाधारण विमा योजना, निवृत्तीवेतन योजना यांचा समावेश होतो.

iv) राष्ट्रीय बँकांनी नमूद केलेल्या इतर सेवांचादेखील यात समावेश होतो.

(जी) 'राष्ट्रीय बँक' म्हणजे, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास कायद्यानुसार स्थापन झालेली राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (१९८२चा कायदा)

(एच)'अधिसूचना' (नोटिफिकेशन) म्हणजे, अधिकृत राजपत्र (गॅझेट) मध्ये नोंद करण्यात आलेली अधिसूचना.

(आय) 'विहीत' म्हणजे या कायद्यामध्ये नमूद करण्यात आलेले नियम.

(जे) 'रिझर्व बँक' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक कायद्यानुसार स्थापन झालेली भारतीय रिझर्व बँक.(१९३४ कायदा, कलम ३)

(के) 'योजना' म्हणजे, कलम २४ च्या उप-कलम१ नुसार बनविण्यात आलेल्या योजना.

(एल) 'बचत' म्हणजे नियमांनुसार लघुवित्त संस्थेने गटांकडून जमा केलेली रक्कम अथवा गटाने, सभासदांकडून जमा केलेली रक्कम. [चालू खाते (करंट अकाउंट) आणि ठेव खात्यात (डिमांड डिपॉझिट) जमा केलेली रक्कम यातून वगळण्यात आली आहे.]

(एम) या मसुद्यात नोंद झालेल्या शब्दांची, संकल्पनांची ज्या ठिकाणी व्याख्या केलेली नाही, त्या शब्दांची रिझर्व बँक कायदा १९३४, बँक नियंत्रण कायदा १९४९ आणि नाबार्ड कायदा १९८१ यामधील व्याख्या गृहीत धरली जाईल.

लघुवित्त विकास मंडळ

(३) लघुवित्तविकास मंडळाचे संविधान

केंद्र शासनाला लघुवित्त विकास मंडळाची उभारणी जाहीर सूचना देऊन करता येईल. असे मंडळ जे, लघुवित्त क्षेत्राचा विकास विशिष्ट गतीने करता यावा यासाठी राष्ट्रीय बँकेला, धोरण, योजना आणि इतर उपाय योजण्यासाठी लागणारा सल्ला देईल.

(४) मंडळाची रचना

लघुवित्त विकास मंडळामध्ये पुढील सभासदांचा समावेश असेल.

ए) अध्यक्ष - केंद्र शासनाने मंजूर केलेली, बँक क्षेत्र, ग्रामीण कर्ज, लघुवित्त क्षेत्राचा अनुभव असलेली व्यक्ती.

बी) सभासद - भारत सरकारच्या सह-सचिवाच्या दर्जाचे दोन अधिकारी, यातील एक अधिकारी वित्त मंत्रालयाने मंजूर केलेला/ली आणि दुसरी व्यक्ती ग्रामीण विकास मंत्रालयाने मंजूर केलेला/ली असणे आवश्यक आहे.

सी) सभासद - रिझर्व बँकेने नियुक्त केलेली रिझर्व बँकेच्या संचालक पदाएवढ्या हुद्याची व्यक्ती.

डी) सभासद - नाबार्ड बँक कायदा १९८१ च्या नुसार राष्ट्रीय बँकेने निवड केलेली संचालक पदाची व्यक्ति (कलम ६/१(ब))

इ) सभासद - भारतीय लघुविकास बँकेने नियुक्त केलेली भारतीय लघुविकास बँकेच्या संचालकपदाच्या दर्जाची व्यक्ती.

एफ) सभासद - राष्ट्रीय बँकेने नियुक्त केलेली, राष्ट्रीय बँकेच्या लघुवित्त

विभागाच्या संचालक पदाच्या दर्जाचा अधिकारी.

जी) सभासद - राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने नियुक्त केलेला राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या संचालक पदाच्या दर्जाचा अधिकारी.

एच) सभासद - बँक क्षेत्र, ग्रामीण कर्ज आणि लघुवित्त क्षेत्रातील कामांचा अनुभव असलेल्या किंवा लघुवित्त संस्था, शेड्युल्ड बँक, बचत सेवा पुरविणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी असलेल्या सहा व्यक्तींची नियुक्ती राष्ट्रीय बँकेच्या सल्ल्याने, केंद्रशासन करेल. ज्यामध्ये कमीत कमी दोन महिला असतील.

(५) मंडळाची कार्ये

राष्ट्रीय बँकेने नमूद केलेल्या लघुवित्त आणि अशा इतर कामांसंबंधी, लघुवित्त विकास मंडळ, राष्ट्रीय बँकेचे सल्लागार मंडळ म्हणून काम करेल.

(६) मंडळाच्या सभासदांचा कालावधी व भत्ता

मंडळाच्या सभासदांचा कार्यकाळ केंद्र शासनाच्या सूचनेनुसार जास्तीत जास्त पाच वर्षांचा राहील. तसेच सभासदांना नियमानुसार, सभांना उपस्थित राहिल्याबद्दल भत्ता व शुल्क मिळेल.

(७) मंडळाच्या सभा

मंडळाच्या सभा या नियमानुसार ठरावीक कालावधीने होतील. सभा या नियमानुसार ठरलेल्या कामकाजासंबंधी असतील.

लघुवित्त संस्थाची नोंदणी

(८) विशिष्ट परिस्थितीत पात्र लाभार्थींना बचत सेवा देण्यावर बंदी

राष्ट्रीय बँक कायद्यानुसार, लघुवित्त संस्थांना राष्ट्रीयकृत बँकांनी दिलेल्या नोंदणी दाखल्याशिवाय त्यांना पात्र लाभार्थीस बचत सेवा पुरविता येणार नाही.

(९) नोंदणी अर्ज

i) नियमात नमूद केल्यानुसार राष्ट्रीय बँकेकडे नोंदणी केल्याविना आणि नोंदणी शुल्क भरल्याविना, प्रत्येक लघुवित्त संस्थेस पात्र लाभार्थी बरोबर बचत सेवेसंबंधीचे व्यवहार करता येणार नाहीत.

ii) हा कायदा लागू होण्याआधीपासून ज्या लघुवित्त संस्था या प्रकारच्या बचतसेवा पुरवत असतील, अशांनी कायदा लागू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत राष्ट्रीय बँकेकडून नोंदणीपत्रासाठी लिखीत अर्ज सादर करायचा आहे.

जोपर्यंत राष्ट्रीय बँकेकडून नोंदणी मिळाली नसल्याचे पत्र येत नाही तोपर्यंत संस्थांना बचतीचे व्यवहार चालू ठेवता येतील.

(१०) नोंदणी दाखला

१) लघुवित्त संस्थांच्या नोंदणीचा दाखला राष्ट्रीय बँकेकडे अर्ज केल्यानंतर तेव्हाच मिळेल जेव्हा, हिशोबासंबंधीच्या नोंद वह्या व खाली नमूद केलेल्या इतरबाबींची तपासणी करून राष्ट्रीय बँक खात्री करेल.

ए) अर्ज केलेल्या संस्थांची कार्यकारिणी सभासद किंवा गटांच्या विकासाच्या आड काम करत नाही ना?

बी) संस्थांनी केलेला अर्ज हा लघुवित्त क्षेत्राच्या प्रगती आणि विकासा करताच आहे ना याची खात्री करेल.

सी) लघुवित्त संस्थांकडे संस्थापकांच्या वर्गणीतून किंवा निधी, देणगी स्वरूपात संस्थेस मिळालेला असा स्वत:चा उपलब्ध निधी कमीत कमी ५,००,००० रूपये असेल तेव्हा आणि

डी) अर्ज केलेल्या संस्था/संघटनेचे कार्य नोंदणी अर्जाआधी कमीत कमी तीन वर्षापासून चालू आहे ना हे पाहिले जाईल.

इ) इतर कोणतीही अट जी राष्ट्रीय बँक आपल्या नियमांमध्ये नमूद करेल.

२) वरील सर्व अटींची पूर्तता झाल्यास, राष्ट्रीय बँक, अर्जकर्त्या संस्थेस बचत सेवा करण्याच्या परवानगीसाठी नोंदणीपत्र देऊ शकते व जरूर असल्यास काही अटी देखील लागू करू शकते.

कोणताही नोंदणी अर्ज, संस्थेची बाजू ऐकून घेऊनच निकालात काढला जाईल.

(११) नोंदणी रद्द करण्याचा राष्ट्रीय बँकेस अधिकार

१) पुढील प्रमाणे अयोग्य वर्तन केले तर, लघुवित्त संस्थांची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रीय बँकेस आहे. [वरील कलम १० (२)]

i) नोंदणीकृत संस्थांनी गटांना किंवा गटाच्या सभासदांना बचत सेवा देणे बंद केले तर किंवा

ii) संस्थेस ज्या उद्देशांसाठी नोंदणी दाखला दिला आहे त्या अटींची पूर्तता केली नसल्यास किंवा

अ) राष्ट्रीय बँकेच्या सदर कायद्यात नमूद केलेल्या कोणत्याही सूचनेची अंमलबजावणी न झाल्यास

ब) लघुवित्त विकास मंडळ अधिकाऱ्यांनी मागणी कलेल्या हिशोब व संबंधित वह्या, तपासणीसाठी सादर न केल्यास [कलम २१(१)]

२) लघुवित्त सेवा पुरविणाऱ्या संस्थांची नोंदणी रद्द ठरविण्याआधी, राष्ट्रीय बँक, अशा संस्थांना अटींची पूर्तता करण्यासाठी विशिष्ट कालावधी देऊन एक संधी देईल. परंतु राष्ट्रीय बँकेच्या लेखी, पात्रता रद्द करण्याचा कालावधी वाढविल्याने सार्वजनिक नुकसान, बँक धोरण, वित्त यंत्रणा, लघुवित्त क्षेत्र किंवा संबंधीत व्यक्तीस धोका पोहचत असेल, तर असा कालावधी न देता राष्ट्रीय बँक ताबडतोब संमती रद्द करू शकते. [कलम २ बी मधील उपकलम (i) व (ii)]

(१२) बचत रक्कम स्वीकारण्यावर बंदीचा अधिकार

या कायद्यातील तरतुदींचे अथवा रिझर्व बँकेने केलेल्या सूचनांचे पालन न करणे, उल्लंघन करणे या कारणांसाठी राष्ट्रीय बँक, लघुवित्त संस्थांना बचत रक्कम स्वीकारण्यावर बंदी घालू शकते. अशी कारवाई करण्याआधी संस्थांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी दिली जाईल.

(१३) कारवाई संबंधी अपील

i) नोंदणी दाखला नाकारणे, नोंदणी दाखला रद्द करणे, बचत रक्कम स्वीकारण्यावर निर्बंध घालणे किंवा लघुवित्त संस्था बंद करणे, अशा कारवाईच्या आदेशासंबंधीचे अपील राष्ट्रीय बँकेने केंद्रशासनाकडे किंवा केंद्रशासनाने सूचित केलेले अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. लघुवित्त संस्थेला, केलेल्या कारवाई संबंधीचा हुकूम जारी केल्यापासून, ६० दिवसांचे आत असे अपील शासनाकडे किंवा संबंधीत अधिकाऱ्याकडे करता येईल.

ii) केंद्रशासन अथवा केंद्रशासनाने सूचित केलेले अधिकारी, यापैकी ज्यांच्याकडे अपील सादर केले असेल, त्यांचा निर्णय हा अंतिम निर्णय समजला जाईल.

राखीव निधी, हिशेब, लेखापरीक्षण आणि विवरण

(१४) राखीव निधीसाठी तरतूद

i) राष्ट्रीय बँकेच्या या कायद्याखाली नोंदणी केलेल्या प्रत्येक लघुवित्त संस्थेस आपल्या एकूण नफ्यापैकी कमीत कमी १५% रक्कम ही राखीव निधी म्हणून ठेवावी लागेल. ही रक्कम वजा केल्याशिवाय लाभांश जाहीर करता येणार नाही किंवा नफ्याची रक्कम अन्य कोणत्याही कारणांसाठी वापरता येणार नाही.

ii) राष्ट्रीय बँकेने वेळोवेळी नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त कोणत्याही हेतूने राखीव निधीतून खर्च करता येणार नाही. तसेच विनियोग केलेल्या रकमेची सूचना, विनियोगाच्या २१ दिवसाच्या आत, राष्ट्रीय बँकेस सादर करणे बंधनकारक राहील.

iii) सार्वजनिक हितासाठी अथवा बचत गटातील सभासदांच्या हितासाठी, लघुवित्त संस्थेस राखीव निधी किंवा त्यातील काही हिस्सा, सुरक्षा ठेव म्हणून गुंतवणूक करण्यास राष्ट्रीय बँक निर्देश करू शकते.

(१५) हिशोब आणि ताळेबंद

आर्थिक वर्षाअखेरीस सर्व लघुवित्त संस्थांना आपल्या बचत सेवा व इतर व्यवहारांचा आर्थिक ताळेबंद (जमा-खर्च किंवा नफा-तोटा स्वरूपात) राष्ट्रीय बँकेने ठरवलेल्या पद्धतीनुसार सादर करणे बंधनकारक राहील.

(१६) लेखापरीक्षण

नफा-तोटा अथवा जमाखर्चाच्या ताळेबंदाचे लेखापरीक्षण (ऑडिट), लेखापरीक्षकाकडून (ऑडिटरकडून) करून घेणे बंधनकारक राहील. मान्यता प्राप्त लेखापरीक्षक किंवा राज्य सहकारी संस्थांचा निबंधक, यांच्याकडूनच लेखापरीक्षण करून घेणे बंधनकारक आहे.

(१७) विशेष लेखापरीक्षण

(i) कंपनी कायदा १९५६ किंवा इतर अस्तित्वात असलेल्या कुठल्याही कायद्यातील नियमांव्यतिरिक्त सार्वजनिक वा बचतगट सभासदांचे हित जपण्यासाठी, आर्थिक वर्षाची अखेर होण्याअगोदरच लघुवित्त संस्थेचे लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता वाटल्यास, तशी सूचना राष्ट्रीय बँक पुढील प्रकारे देऊ शकते.

ए) लघुवित्त संस्थेच्या विशिष्ट व्यवहारासंबंधी किंवा विशिष्ट काळातील हिशोबासंबंधी लेखापरीक्षणाची जबाबदारी लेखापरीक्षकावर सोपवू शकते. अशा परिस्थितीत लेखापरीक्षकाने यासंबंधीचा अहवाल राष्ट्रीय बँकेस सादर करणे व त्याची एक प्रत संबंधित संस्थेस देणे बंधनकारक राहील.

बी) विशिष्ट कालावधी आणि परिस्थितीमध्ये लेखापरीक्षकाची नेमणूक करताना संस्था/संघटनांना राष्ट्रीय बँकेची परवानगी घ्यावी लागेल आणि राष्ट्रीय बँकेच्या सूचनांचे पालन करावे लागेल.

(ii) लेखापरीक्षकाची कार्ये पार पाडण्याचे अधिकार, लेखापरीक्षकास आहेत. कंपनी कायदा १९५६, कलम २२७ नुसार लेखापरीक्षकाला लागू होणारे, दंड आणि दायित्त्वासंबंधीचे नियम इथेही लागू होतील. त्याचप्रमाणे १९४९ च्या बँकिंग कायद्यानुसार लागू होणारे नियम, या कायद्यानुसार नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकास लागू पडतील.

(iii) लेखापरीक्षकाचे मानधन आणि इतर संबंधीत खर्च, हा संबंधित संस्थेने करणे अपेक्षित आहे.[कलम १(ए)]

(१८) लघुवित्त संस्थांनी सादर करायचे विवरण

हा कायदा अंमलात आलेल्या दिवसापासून ९० दिवसाच्या आत आणि नियमानुसार, वेळोवेळी संस्थांनी आपल्या कार्याचे स्वरूप, सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौंटंट) किंवा कंपनी सचिव (कंपनी सेक्रेटरी) किंवा राज्य सहकारी संस्थांच्या निबंधकाकडून प्रमाणित करून घेणे आणि राष्ट्रीय बँकेस सादर करणे बंधनकारक आहे.

बचत आणि लघुवित्त सेवांसंबंधी राष्ट्रीय बँकेची कार्ये आणि अधिकार

(१९) राष्ट्रीय बँकेची कार्ये आणि अधिकार

(i) लघुवित्त क्षेत्राचा विकास आणि प्रगती साधणे हे राष्ट्रीय बँकेचे कार्य राहील.

(ii) विकास आणि प्रगती साधण्यासाठीची कार्ये पुढीलप्रमाणे -

ए) लघुवित्त क्षेत्राची प्रगती होण्यासाठी, कार्यपद्धतीत पारदर्शकता निर्माण होण्यासाठी, प्रभावी व्यवस्थापनासाठी, उत्तम कारभारासाठी, बचत-लघुवित्त सेवांचा पुरेपुर वापर होण्यासाठी धोरण आखणे.

बी) कार्यपद्धती, वसुलीच्या पद्धती आणि व्यवस्थापन यासंबंधी या क्षेत्राचे निकष आणि प्रमाण तयार करणे अथवा त्यासाठी संस्थांना प्रवृत्त करणे आणि लघुवित्त संस्थांच्या व्यवहारासंबंधी एक आदर्श पद्धती निर्माण करणे.

सी) पतविषयक दर्जा निश्चिती करणाऱ्या अथवा लघुवित्त संस्थांच्या अन्य बाबतीतला दर्जा निश्चित करायला मदत करणे.

डी) बचतीसंबंधी, बचतीशिवाय इतर कार्य करणाऱ्या, सर्व लघुवित्त संस्थांच्या हिशेब लिखाणाच्या पद्धती ठरविणे.

इ) लघुवित्त संस्थांच्या व्यवहाराच्या हिशेब पद्धती ठरवणे आणि लेखापरीक्षणच्या पद्धतीचे प्रमाणीकरण करणे.

एफ) या कायद्याच्या उद्देशपूर्तीसाठी लघुवित्त क्षेत्रांची माहिती आणि आकडेवारी योग्य पद्धतीने संस्थांकडून मागवून ती संकलीत करून लोकांना प्रसार यंत्रणेद्वारे खुली करणे आणि राष्ट्रीय स्तरावर सर्वत्र पोहचवणे.

जी) प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी शिबिरांद्वारे, बचत आणि लघुवित्त संस्थांशी संबंधित गट आणि इतरांसाठी संस्थात्मक विकासासाठी मदत करणे.

एच) लाभार्थींच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, जाणीवा प्रगल्भ करण्यासाठी लघुवित्तसेवा आणि बचत सेवा पुरविणाऱ्या सर्वांसाठी 'ग्राहक-शिक्षणाला' उत्तेजन देणे.

आय) या क्षेत्रासंबंधीच्या संशोधनास, संकलनास पाठबळ देणे आणि ते सर्वत्र उपलब्ध करून देणे.

जे) लघुवित्त क्षेत्रातील संबंधितांच्या प्रगती आणि विकासासाठी इतर संस्थांशी समन्वय साधणे.

के) पात्र लाभार्थींना बचत सेवा व लघुवित्त सेवा परवडणाऱ्या दराने मिळाव्या यासाठी योग्य व्यवहारिक पद्धतींची माहिती जमा करणे व तिचा प्रसार करणे.

एल) या संबंधी इतर नमूद कार्ये पार पाडणे.

(२०) बचत स्वीकारणाऱ्या लघुवित्त संस्थांना आदेश देण्याचा अधिकार

i) सार्वजनिक हितासाठी किंवा लघुवित्तसंबंधी धोरणाच्या हितार्थ किंवा लाभार्थींचे व संबंधित संस्थेचे हित लक्षात घेऊन किंवा संस्थांच्या सुरक्षित व्यवस्थापनासाठी सर्वसाधारणपणे सर्व लघुवित्त संस्थांना किंवा विशिष्ट लघुवित्त संस्थांना आदेश देण्याचा अधिकार राष्ट्रीय बँकेस आहे. या सर्व बाबतीत लघुवित्त संस्थांना, राष्ट्रीय बँकेने दिलेल्या अशा आदेशांचे पालन करणे बंधनकारक आहे.

ii) राष्ट्रीय बँक स्वत: ठराव संमत करून मार्गदर्शक तत्त्वात बदल करू शकते अथवा मूळ सूचना रद्द करून योग्य त्या अटी लागू करू शकते.

(२१) तपासणी

(i) राष्ट्रीय बँक, कधीही, लघुवित्त संस्थेची तपासणी करू शकते. (संस्था बचत सेवा पुरवत असो अथवा नसो) बँकेने ठरवलेल्या नियमांनुसार आणि अटींनुसार नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास हिशोब तपासणीसाठी देणे आणि तपासणी अधिकाऱ्याने त्याचा अहवाल राष्ट्रीय बँकेस सादर करणे बंधनकारक आहे.

(ii) तपासणी अहवालाची प्रत लघुवित्त संस्थेस पुढील बाबींमध्ये दिली जाईल. जर,

अ) लघुवित्त संस्थेने तशी मागणी केल्यास,

ब) संबंधित संस्थेवर सदर अहवालावर आधारीत कार्यवाही अभिप्रेत असल्यास.

(iii) राष्ट्रीय बँकेने अहवालाची पडताळणी केल्यानंतर जर असे लक्षात आले, की लघुवित्त संस्थेच्या व्यवहाराने लाभार्थीच्या हितास हानी पोहचत आहे, तर राष्ट्रीय बँक अशा संस्थेला याचे स्पष्टीकरण देण्यास सांगून, तिचे कामकाज कायमचे बंद करू शकते.

लघुवित्त विकास संविधान आणि समभागनिधी (Equity Fund)

(२२) केंद्र शासनाचे अनुदान

लघुवित्त विकास व नियमन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, संसदेत कायदा संमत केल्यानंतर, केंद्रशासन, आवश्यक असे अनुदान राष्ट्रीय बँकेस देण्याविषयी संमती देऊ शकते.

(२३) लघुवित्तविकास निधी

(i) राष्ट्रीय बँक 'लघुवित्तविकास आणि समभाग निधीची' (इथून पुढे याचा उल्लेख 'निधी' असा केला जाईल) उभारणी करेल. या निधीचा स्रोत पुढील मार्गांनी असेल -

ए) सर्व सरकारी अनुदाने आणि या कायद्यांतर्गत जमा झालेले शुल्क.

बी) या कायद्यातील उद्दिष्टांसाठी राष्ट्रीय बँकेने दात्यांकडून (डोनर्स), सरकारकडून इतर संबंधितांकडून आणि जनतेकडून जमा केलेली रक्कम.

सी) या निधीच्या गुंतवणुकीतून मिळालेल्या व्याजाची रक्कम.

डी) या कायद्याच्या अंमलबजावणी आधी राष्ट्रीय बँकेने लघुवित्त विकास आणि समभाग निधी म्हणून जमा झालेली रक्कम या निधीचा भाग बनेल.

(ii) राष्ट्रीय बँकेचे संचालक मंडळ या निधीचे कायद्यातील तरतुदींप्रमाणे व्यवस्थापन करेल.

(iii) हा निधी पुढील कारणांसाठी उपयोगात आणता येईल.

ए) राष्ट्रीय बँकेने नमूद केलेल्या संस्थांना कर्ज, पुर्नवित्तपुरवठा, अनुदान,

बीज भांडवल किंवा वित्तीय साहाय्य अशा कारणांसाठी .

बी) राष्ट्रीय बँकेने घालून दिलेल्या निकषाप्रमाणे लघुवित्त सेवा पुरविणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी आणि क्षमता बांधणीसाठी व अनुषंगिक खर्चासाठी अनुदान वा कर्ज म्हणून.

सी) लघुवित्त संस्थेच्या समभाग किंवा इतर प्रकारच्या भांडवली गुंतवणुकीत राष्ट्रीय बँकेच्या नियमानुसार ठेव म्हणून गुंतवणे.

डी) लघुवित्तासंबंधी माहिती जमा करणे, विश्लेषण करणे आणि माहिती प्रसारित करणे, यासाठी लागणारे संशोधन, प्रयोग व अभ्यास करणे. आणि या क्षेत्राचा विकास होईल अशा पद्धती निर्माण करणे व त्यांचा प्रसार करणे अशा येणाऱ्या सर्व खर्चासाठी.

इ) राष्ट्रीय बँकेला, लघुवित्त क्षेत्राच्या विस्तारासाठी येणारे इतर खर्च.

एफ) राष्ट्रीय बँकेच्या कामकाजात, कायद्याने नमूद केलेल्या इतर कार्यांसाठी येणारा खर्च म्हणून. (या खर्चात वेतन, भत्ते अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार समाविष्ट नाहीत)

वाद-तंट्याच्या निवारणासाठी यंत्रणा

(२४) वाद-तंट्यावरील तोडगा काढण्यासाठी लघुवित्त मध्यस्थाची नेमणूक

(i) पात्र लाभार्थी आणि लघुवित्त संस्था यांच्यातील वाद-तंटा आणि तक्रारींचे निवारण करण्याच्या हेतूने, लघुवित्त संस्थांना मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्याचा अधिकार असलेल्या लघुवित्त मध्यस्थाची नियुक्ती, लघुवित्त विकास मंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रीय बँकेस करता येईल.

(ii) लघुवित्त मध्यस्थीसाठी अशी योजना बनवणे ज्यामध्ये पुढील बाबी केल्या जातील :

ए) मध्यस्थाची नियुक्ती, कार्यकाल, सेवेच्या अटी, मध्यस्थाचे कार्यालय,

बी) मध्यस्थांनी स्वीकारायच्या तक्रारी आणि वाद-तंट्यांचे स्वरूप आणि निवारणाची कार्यपद्धती,

सी) मध्यस्थाच्या प्रभावी कामकाजासाठी आवश्यक अशा इतर बाबी.

गुन्हा आणि शिक्षा

(२५) हेतूतः केलेल्या असत्य विधानासाठी शिक्षा

i) कोणत्याही अर्जात, माहिती देताना, जाहीर सूचना देताना, विधान करताना या कायद्याने मागणी केलेल्या इतर कोणत्याही कागदपत्रात, हेतूतः केलेले असत्य विधान, माहिती अढळल्यास किंवा सत्य लपविण्यासाठी हेतूतः काही (कागद, ओळी) गाळल्यास संबंधितास २ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा सुनावण्यात येईल.

ii) या कायद्यानुसार केलेल्या मागण्या, हुकूम, नियम, मार्गदर्शक तत्त्वे यांचे पालन न करणे अथवा कायद्याचे उल्लंघन करणे यासाठी संबंधीतांस रू.२०,००० पर्यंत दंड होऊ शकतो आणि जर पुढील काळात गुन्हा चालूच राहीला तर हा दंड दिवसाला रू. १०००, त्यानंतरही तो चालू राहिल्यास २ वर्षापर्यंतचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी सुनावल्या जातील.

(२६) कलम १२ चे किंवा मध्यस्थांच्या आदेशांचे उल्लंघन केल्यास दंड

i) कलम १२ नुसार तरतुदींची पूर्तता न करणे, मध्यस्थाच्या वा केंद्र सरकारच्या हुकूमाचे पालन न करणे किंवा कलम १३ नुसार इतर अधिकाऱ्यांच्या सूचनेचे पालन न करणे यासाठी संबंधितांस ३ वर्षापर्यंत कैद आणि गुन्हा चालू राहिल्यास कमीत कमी प्रतिदिनी रू. ५०० दंड केला जाईल.

ii) ठेव परत देताना अथवा स्वीकारताना त्यासंबंधी केलेला कोणताही गुन्हा हा दखलपात्र गुन्हा म्हणून नोंदवला जाईल. (१९७३ चा गुन्हेगारी कायदा)

(२७) लघुवित्त संस्थांशी संबंधित गुन्ह्यांचे प्रकार

i) या कायद्यानुसार, लघुवित्त संस्थेतील ज्या जबाबदार व्यक्तीने गुन्हा केला आहे, ती व्यक्ती आणि संबंधित संस्था दोन्हीस दोषी मानून शिक्षा फर्मावली जाईल.

जर त्या व्यक्तीने संबंधित गुन्हा तिच्या अपरोक्ष घडला अथवा संबंधित गुन्हा घडू नये, यासाठी तिने केलेला प्रयत्न हे ती सिद्ध करू शकली तर ती शिक्षेस अपात्र ठरेल.

ii) या कायद्यानुसार, लघुवित्त संस्थेकडून घडलेला गुन्हा सिद्ध झाल्यास आणि संचालक, विश्वस्त, कार्यकारी मंडळ सदस्य, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी, कर्मचारी या प्रकरणात अप्रत्यक्षपणे सामील असल्यास त्या

व्यक्तीस शिक्षा फर्मावली जाईल. (अप्रत्यक्षपणे म्हणजे - ह्या व्यक्तींच्या संगनमताने, परवानगीने, ह्या व्यक्तींनी कानाडोळा केल्याने घडलेला गुन्हा)

स्पष्टीकरण : या प्रकरणातील कोणताही गुन्हा हा या कायद्यानुसार प्रमुख कार्यालयाच्या ठिकाणी किंवा नोंदणी केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर घडल्यास तो दखलपात्र मानला जाईल.

(२८) गुन्ह्यासंबंधी कोर्टाने घ्यावयाची दखल

i) राष्ट्रीय बँकेचा अधिकारी किंवा राष्ट्रीय बँकेने अधिकार दिलेली व्यक्ती जोपर्यंत गुन्हा दाखल करीत नाही; तोपर्यंत कोर्ट त्या गुन्ह्याची दखल घेऊ शकत नाही.

ii) महानगरीय दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पेक्षा खालच्या दर्जाच्या कोर्टात संबंधित गुन्ह्याचा न्यायनिवाडा होऊ शकत नाही.

विविध तरतूदी

(२९) मालमत्तेवर सभासदांचा प्रथम अधिकार

लघुवित्त संस्थेने आपल्या सभासदांचे किंवा लाभार्थींच्या ठेवी परत केल्या नसतील, तर संस्थेच्या मालमत्तेवर पहिला अधिकार त्यांचा राहील. [कलम १४ (३)]

(३०) केंद्रशासनाचा माहिती मागविण्याचा अधिकार

केंद्रशासन स्वतः ठरवेल त्या पद्धतीने, राष्ट्रीय बँकेच्या सल्ल्याने वेळोवेळी, लघुवित्त संस्थांकडून कागदपत्रे, माहिती इत्यादीची मागणी करू शकते आणि अशा संस्थेस ही मागणी पूर्ण करणे बंधनकारक ठरते.

(३१) माफीचा अधिकार

लघुवित्त संस्थेस किंवा कोणत्याही प्रकारच्या संस्थेस या कायद्यातील तरतूदी कायमस्वरूपी अथवा विशिष्ट काळापर्यंत, लागू न करण्यामध्ये, जनतेचे हित अथवा त्या लघुवित्त संस्थेचे हित आहे, असे केंद्रशासनास लक्षात आल्यास तसे लेखी आदेश देण्याचा अधिकार केंद्रशासनास आहे.

(३२) इतर कायद्यांना बाधा न आणण्याची तरतूद

या कायद्यातील तरतुदी, अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांच्या तरतुदींशी विसंगत असणार नाहीत.

(३३) नियम बनविण्याचा अधिकार -

(i) या कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, केंद्र सरकार अधिकृत पत्रकात(गॅझेट) नोंद करून त्यासंबंधी नियम बनवू शकते.

(ii) हे नियम पुढील काही बाबतीत किंवा सर्व तरतुदी बाबतीत बनवले जाऊ शकतात.

ए) शेतकऱ्यांच्या मालकीच्या शेत जमिनीच्या क्षेत्राबाबत [कलम २ बी (i)],

बी) कलम २ ब, उपकलम (iv) नुसार ठरणारे इतर गटांबाबत,

सी) कलम २ फ, उपकलम (i) मधील इतर रक्कम व उद्देशाबाबत,

डी) कलम २, उपकलम (i) मधील रक्कम व अटींबाबत,

इ) कलम १९ च्या उपकलमातील राष्ट्रीय बँकेच्या इतर कार्यांविषयी,

फ) इतर गरजेच्या किंवा सूचित करण्यात आलेल्या बाबींबाबत.

(३४) नियमनाचा (रेग्युलशन) अधिकार

(i) केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने, अधिकृत सरकारी पत्रकात (गॅझेट) नोंदवल्यानंतर, या कायद्यातील उद्देशानुसार नियम बनवण्याचे अधिकार, राष्ट्रीय बँकेस प्राप्त होतात.

(ii) नियमन हे खालीलपैकी कोणत्याही किंवा सर्व प्रकरणात करता येते :

ए) लघुवित्त विकास मंडळाच्या सभासदांना देण्यात येणाऱ्या भत्त्याच्या आणि शुल्काच्या रक्कमेबाबत (कलम ६),

बी) लघुवित्त विकास मंडळाच्या कामकाजा संबंधीच्या बैठकांची वेळ, स्थळ आणि पद्धती ठरवणे बाबत (कलम ७),

सी) राष्ट्रीय बँकेकडे, लघुवित्त संस्था संघटनांनी नोंदणी अर्ज आणि शुल्क दाखल करण्याच्या पद्धतीबाबत (कलम ९, उपकलम १),

डी) नोंदणी पत्रांसंबंधीच्या अटी ठरविण्याबाबत.[कलम १०(i)(इ)]

इ) सुरक्षाठेवींची गुंतवणूक करण्याबाबत [कलम १४ (३)],

एफ) ताळेबंद, उत्पन्न-खर्च किंवा नफा-तोट्याचा हिशोब मांडण्याच्या पद्धतीबाबत (कलम १५),

जी) राष्ट्रीय बँकेकडे सादर करायच्या विवरण(रिटर्न)बाबत (कलम १८),

एच) लघुवित्त संस्थेचे कामकाज संपुष्टात आणण्याच्या पद्धतीबाबत [कलम २१(३)],

आय) राष्ट्रीय बँकेच्या संचालक मंडळाने करावयाच्या लघुवित्त विकास निधीच्या व्यवस्थापन पद्धतीबाबत [कलम २३(२)],

जे) कर्ज, पुर्नवित्तपुरवठा, अनुदान (ग्रँट), बीज भांडवल आणि अन्य अशा वित्त पुरवठा करण्यासंबंधीच्या शर्ती व अटींबाबत [कलम २३ (३) (ए)],

के) राष्ट्रीय बँकेने अनुदान वा कर्ज देण्यासंबंधीच्या अटींबाबत [कलम २३ (३) (ब)],

एल) लघुवित्त संस्थेने करावयाच्या भागभांडवल वा इतर भांडवल गुंतवणुकी संदर्भातील अटी व शर्तीबाबत [कलम २३ (३) (सी)],

एम) या कायद्यानुसार राष्ट्रीय बँकेच्या कामकाजासाठी आलेल्या इतर खर्चाबाबत.(वेतन, भत्ता आणि अधिकारी बँकेचे कर्मचारी यांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्या व्यतिरिक्त) [कलम २३ (३) (एफ)],

एन) राष्ट्रीय बँकेस गरजेच्या वाटणाऱ्या इतर बाबींविषयी.

(३५) संसदेत मांडावयाचे नियम व नियमन

केंद्र शासनाने बनवलेले नियम आणि राष्ट्रीय बँकेने बनवलेले नियम तसेच जाहीर केलेली सूट, संसदेच्या सर्व सभागृहात सादर करणे गरजेचे आहे. हे सादरीकरण एकूण ३० दिवसात १ सत्रामध्ये किंवा लागोपाठच्या २ किंवा अधिक सत्रांमध्ये करणे गरजेचे आहे. दोन्ही सभागृहांनी, मंजूर केलेले बदलच लागू होतील. केलेले बदल मूळ नियम वा नियमनास अनुसरूनच असणे आवश्यक आहे. (कलम ३१)

(३६) इतर कायद्यांना धरून

सदर कायद्यातील तरतुदी या मूळ कायद्याला धरून असतील आणि अस्तित्वातील इतर कायद्यास त्यामुळे नुकसान पोहचणार नाही.

(३७) अडचणी दूर करण्याचा अधिकार

i) कायदा अस्तित्वात आल्यानंतर दोन वर्षांच्या आत, अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कायद्याशी संलग्न राहूनच बदल करता येतील. ज्याचे आदेश केंद्रशासन अधिकृत सरकारी पत्रात (गॅझेट) प्रकाशित करेल.

ii) अशा प्रकारे करण्यात आलेल्या बदलांचे आदेश काढण्यापूर्वी ते संसदेतील प्रत्येक सभागृहात मांडावे लागतील.

उद्दिष्टे आणि कारणे

(अर्थमंत्री श्री. पी. चिंदबरम यांनी संसदेत वरील लघुवित्त सेवा व विकास नियमन विधेयकासंदर्भात मांडलेली उद्दिष्टे आणि हे विधेयक आणण्यामागची सांगितलेली कारणे)

१) भारतीय बँक क्षेत्राने प्रगती साधली आहे. प्रत्येक बँकेच्या सरासरी ग्राहकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पत उपलब्धतेची दरी कमी झाली आहे. परंतु या प्रगतीपासून गरीब आजही वंचित आहेत. बचत, पत, हस्तांतरण यासारख्या प्राथमिक वित्तीय सेवांही त्यांना उपलब्ध होत नाहीत. अशा प्रकारच्या वित्तीय वंचिततेमुळे त्यांना समान संधी उपलब्ध तर होत नाहीच, पण भेदभावासही सामोरे जावे लागते.

२) लघुवित्त क्षेत्रामध्ये बिगर सरकारी संस्था (एनजीओ), सामाजिक संस्था, न्यास आणि सहकारी संस्था कार्यरत आहेत. महिला, गरीब व इतर वंचित गट आणि लघुउद्योगांना वित्त सेवा पुरविण्याचे कार्य त्या संस्था करतात. परंतु या कार्याला कोणत्याही कायदेशीर चौकटीचा आधार नाही.

३) लघुवित्त क्षेत्रासाठी याच कारणांनी, विकास आणि विनियमन साधण्यासाठी नवीन कायदा अंमलात आणणे गरजेचे आहे.

या विधेयकाची वैशिष्ट्ये

ए) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेस (नाबार्ड), लघुवित्त क्षेत्राची कार्ये, विकास आणि विनिमयासंबंधी अधिकार लागू करणे.

बी) राज्य शासना अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था, स्व-हित किंवा स्वसहाय्य संस्था, बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२ अंतर्गत ज्यांची नोंदणी झाली आहे अशा बहु-राज्य सहकारी संस्था, १८६०च्या संस्था नोंदणी कायद्यांतर्गत येणाऱ्या संस्था, १८८२च्या न्यासनोंदणी कायद्याखाली येणाऱ्या संस्था या आणि यासारख्या इतर लघुवित्त सेवेत असलेल्या संस्था, गट यांचे कायद्याने स्वरूप निश्चित करणे.

सी) लघुवित्त सेवांचा वापर करणारे स्वयंसाहायता गट किंवा संयुक्त दायीत्व असलेले कर्ज गट, अशा गटांतील विविध लाभार्थींचे प्रकार निश्चित करणे.

डी) राष्ट्रीय बँकेने नमूद केलेल्या मर्यादित गटातील सभासद किंवा गटांपर्यंत लघुवित्त सेवा आणि अशा प्रकारचे इतरही वित्तीय साहाय्य करणे.

इ) राष्ट्रीय बँकेच्या नियमांनुसार नोंदणीकृत लघुवित्त संस्थांना चालू खाते

आणि ठेव खाते अशा बचत स्वीकारण्याची तरतूद करणे.

एफ) लघुवित्त क्षेत्राची प्रगती आणि विकास साधण्यासाठी लागणारे धोरण, योजना आणि इतर पावले उचलण्यासाठी राष्ट्रीय बँकेला लागणारा सल्ला देऊ शकेल अशा लघुवित्त विकास मंडळ निर्माण करण्याची तरतूद करणे.

जी) स्वयंसाहाय्य गटांच्या यंत्रणेद्वारा किंवा गटातील व्यक्तिगत सभासदांकडून बचत जमा करणाऱ्या लघुवित्त संस्थांच्या नोंदणीची तरतूद करणे.

एच) लघुवित्त संस्थांनी नियमित हिशेब ठेवणे, जमाखर्च, ताळेबंद व योग्य मुदतीत विवरण पत्रके दाखल करणे आणि राखीव निधी उभारण्यासाठी तरतूद करणे.

आय) बचत व इतर लघुवित्त सेवांसंबंधीची कार्ये व निर्णयाचे अधिकार राष्ट्रीय बँकेकडे सोपवणे.

जे) लघुवित्त क्षेत्राच्या विकासासाठी लघुवित्त विकास आणि समभाग निधी संबंधी तरतूद करणे.

के) पात्र लाभार्थी व लघुवित्त संस्था यांच्यातील तंटा/वाद मिटवण्यासाठी लघुवित्त मध्यस्थांची नेमणूक करणे व या नेमणूकीची योजना, पद्धती तयार करण्यासाठी राष्ट्रीय बँकेस समर्थ बनवणे.

एल) विधेयकातील विनियमाप्रमाणे पूर्तता न झालेल्या बाबींसाठी आणि इतर गुन्ह्यांसाठी दंड/शिक्षा लागू करणे.

एम) केंद्र शासनास, विधेयक अस्तित्वात येण्यासाठी लागणारे नियम तयार करण्यासाठी समर्थ बनवणे.

एन) राष्ट्रीय बँकेस, केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने विधेयक अस्तित्वात येण्यासाठी लागणारे नियम व नियमावली तयार करण्यासाठी समर्थ बनवणे.

४) वरील उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे.

नवी दिल्ली
१२ मार्च २००७

पी. चिदंबरम्
अर्थमंत्री.

मराठी भाषांतर/
सम्राट शिरवळकर

विधेयकाबाबतची योग्य भूमिका

बचत गट चळवळीची भूमिका, महिलांचा स्वावलंबी विकास व त्यांचे सक्षमीकरण या मुद्दयांच्या संदर्भात या विधेयकाकडे पाहिले तर काय दिसते? महिलांचे नेतृत्व तयार होण्यासाठी या विधेयकाचा उपयोग आहे का? का केवळ अर्थवादी भूमिका या मसुद्यात घेतली आहे? सरकारने पूर्वीचे कल्याणकारी धोरण या विधेयकाद्वारे सुध्दा सोडून दिले काय? या दृष्टिने काही महत्त्वाचे मुद्दे येथे देत आहोत. त्याचा विचार व्हावा व लोकांनी त्यांच्या प्रतिक्रिया सरकारकडे नोंदवाव्यात.

कायदा कशासाठी?

विधेयकामध्ये असे गृहीत धरले आहे की बचतगट चालवणाऱ्या संस्थांचा कारभार अनियंत्रित आहे व त्यांना कायद्याखाली आणून नियमबद्ध केले पाहिजे असे म्हटले आहे. अतिशय वेगाने व अनियंत्रितपणे वाढणाऱ्या बचत गटांना नियंत्रित करणे आवश्यक आहे हे खरेच. त्यासाठी स्वतंत्र कायदाही झाला पाहिजे हेदेखील खरे आहे. बचत गटाच्या नावाने वंचित घटकातील लोकांची, विशेषत: महिलांची फसवूणक होऊ नये यासाठी या कायदा मोलाचा आहे.

खरेतर, काही बँका व्यतिरिक्त, वित्त सेवा पुरवणाऱ्या कंपन्या या केवळ नफ्यासाठी वित्तक्षेत्रात कार्य करतात. यामध्ये काही मक्तेदार कंपन्याही येऊन, मोकाट व्यवहार करत आहेत आणि कितीही व्याजदर आकारत आहेत. या कंपन्या रिझर्व्ह बँक व कंपनी कायद्याखाली नोंदवल्या गेल्या आहेत. बँकांचे नियंत्रण करणारा कायदा तसेच रिझर्व्ह बँक व बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट व कंपनी कायदा हे कायदे या दृष्टीने अतिशय ढीले आहेत. खर म्हणजे या नव्या लघुवित्त विधेयकांने या कंपन्या व बँका यांच्या व्यवहारांवर निर्बंध आणले पाहिजेत.

तसेच मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाखाली कंपनी कायद्यात सुधारणा करून

त्यात परदेशी भांडवलाला मोकळीक दिली आहे. त्यामुळे आधीच देशी कंपन्यां परदेशी कंपन्यांच्या दावणीला बांधल्या जात आहेत. बचत गटाबाबती तरी तसे होऊ नये म्हणून आधीच काळजी घ्यायला हवी. म्हणून सदर विधेयकात 'थेट परदेशी गुंतवणुकी'ला (Foriegn Direct Investment) बंदी घालणारे कलम असावे.

तसेच काही संस्था वाट्टेल तशी व्याज आकारणी करतात, सभासदांना कर्ज घेण्याची जबरदस्ती किंवा कर्ज घेतल्यामुळे संस्थेचा फायदा होतो म्हणून सभासदांना लालूच दाखवतात. हे सर्व वंचित घटकांच्या बाबतीत घातक आहे. अशा प्रकारच्या व्यवहारातून महिलांचे परावलंबित्व वाढणार आहे. तरी अशा प्रकारे जबरदस्ती कर्ज देणे आणि स्वार्थासाठी व्यवहार करणाऱ्या संस्थांना नियंत्रणाखाली आणणे, त्यांची कायद्याखाली नोंदणी होणे हे योग्यच आहे.

परंतु बचत गटांची बऱ्याच भागात महासंघ (फेडरेशन्स) होत आहेत त्याची दखल या विधेयकाने घेतलेली नाही. हे महासंघ स्वावलंबी पध्दतीने व्यवहारही करताहेत. त्यांचे अनुभव लक्षात घेऊन अशा प्रकारच्या महासंघांना नोंदणी करताना प्राधान्य दिले जावे. त्याच प्रकारे महासंघांचा अभ्यास करून, खऱ्या अर्थी वंचित घटकासाठी कार्य करणारी अशा पध्दतीचे महासंघ तयार व्हावेत यासाठी विधेयकात तरतूद करावी.

केवळ नफ्याच्या प्रेरणेने वित्त पुरवठा करणाऱ्या नोंदणीकृत कंपन्यांना आणि नफ्याच्या प्रेरणेने कार्य करणाऱ्या संस्थांना या कायद्याखाली आणणे व महासंघांना इथून पुढील काळात नोंदणी करता येईल, अशी कलमात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

या विधेयकातील इतर कलमे वंचित महिलांच्या स्वावलंबी विकासासाठी पूरक आहेत का हे पाहणे महत्त्वाचे. त्या दृष्टीने याकडे पाहिले तर काही प्रमुख मुद्दे येथे देत आहोत.

विरोध कोणत्या मुद्द्यांना?

वरील दृष्टिकोनातून याकडे पाहिले तर या विधेयकातील कलमांमधून काय दिसते? या विधेयकाला विरोध का हे जाणून घ्यायला हवे. त्यासाठी विचारार्थ काही मुद्दे येथे दिले आहेत. याबद्दल सर्व बचत गटांनी, संस्थांनी कृती करणेदेखील आवश्यक आहे. याबाबत एकत्रीतपणे देवाणघेवाण झाली तर मोठ्या ताकदीनिशी संघटितपणे या विधेयकात बदल करण्यासाठी आणखी पुढचे पाऊल टाकता येईल.

१) वंचितांची अवहेलना

एकीकडे एक एकरच्या आतील शेतकरी, मजूर सभासद होऊ शकतील व ते कायद्याने पात्र लाभार्थी असतील असे म्हटले आहे. पण या लाभार्थींना संपूर्ण विधेयकात फारसे स्थान नाही. त्याच प्रमाणे ज्या संस्थेची किमान ५ लाख रुपयांची मालमत्ता आहे अशा आणि ३ वर्षे पूर्ण केलल्या संस्थेलाच नोंदणीसाठी अर्ज करता येईल असे म्हटले आहे. (कलम १०/१ सी) हे पाहता गरिबांना कायदेशीर संस्था करण्यापासून व परिणामी, इतर सवलतींमधून वगळण्यात येण्याचा धोका आहे.

म्हणजे ज्या उद्देशाने बचत गट तयार होताहेत व एकत्र येताहेत - आर्थिक विवंचनेतून बाहेर पडणे, सामूहिक विकास करणे, ते मूळ उद्देशच खड्ड्यात जातील. आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, विशेषत: महिला-बहुजन समाज-आदिवासी-दलित इत्यादी घटक यातून बाहेर फेकले जातील. अस्तित्वात असलेल्या पैसेवाल्यांच्या पतसंस्था किंवा कंपन्या यांचाच यात फायदा होईल. तर दुसरीकडे हे वंचित घटक पैसेवाल्या मोठ्या संस्थांच्या दावणीला बांधले जातील. शहरी व ग्रामीण भागातील धनदांडगे गट या संस्थांच्या माध्यमातून आपली दादागिरी व शोषण चालू ठेवतील.

म्हणून, कायद्यातून ५ लाख रुपयांची ही अट वगळली गेली पाहिजे व मुख्यत: ग्रामीण महिला-आदिवासी-दलित व बहुजन समाजातील वंचित घटकांना समोर ठेवून त्या संस्थांना व त्यांच्या महासंघांना कायद्याने मान्यता दिली पाहिजे.

२) व्याजाच्या दरावर कसलाच निर्बंध नाही

विधेयकाच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, 'शहरी व ग्रामीण लघुवित्त क्षेत्रामध्ये वाढ व्हावी आणि त्याचा विकास व्हावा, तसेच अशा गटांद्वारे महिला व इतर उपेक्षित घटकांना आर्थिक सेवांचा लाभ घेण्यास सुयोग्य वातावरण निर्माण व्हावे...'

मसुद्याच्या प्रस्तावनेत असे म्हटले असले तरी कलमांमध्ये तशा प्रकारची कसलीच समज किंवा आस्था दिसून येत नाही. या विधेयकात गरिबांचे हित रक्षण करण्याचे कुठलेच मार्ग दिसत नाहीत. त्या ऐवजी ''बचतीला ग्रामीण व शहरी भागांमध्ये प्रोत्साहन देणे व तिचा विकास व वाढ करणे एका सार्वत्रिक व सर्वव्यापी आर्थिक व्यवस्थेबरोबर तिचा संबंध जोडण्याच्या'' उद्देशाने विधेयक आणले आहे. याचा अर्थ काय होतो?गरिबी दूर करण्याच्या मद्द्याला पूर्ण फाटा दिलेला आहे.

फारफार तर गरिबीतच थोडी मदत मिळेल एवढेच!

परंतु कर्ज घेणाऱ्यांना लावल्या जाणाऱ्या व्याजाबाबत काही ठोस तरतूद या विधेयकात नाही. याचा अर्थ काय होतो? म्हणजे गरिबांना पुन्हा सावकारी पाशात गोवण्याचा विचार. एवढेच की आता नवे सावकार तयार होत आहेत - या मक्तेदार, व्यापारी कंपन्या! आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे आंध्रप्रदेश. खरे पाहिले तर राष्ट्रीय महिला कोषाने व्याजदर हा जास्तीत जास्त अठरा टक्के ठेवावा अशी स्पष्ट सूचना केली आहे. मात्र आंध्रप्रदेश सरकारने बँकांना व्याजदरासाठी खुली सूट दिली व वसुलीवर निर्बंध घातले नाही. म्हणजेच कंपन्यांना, पतसंस्था वा इतर वित्त सेवा पुरवणाऱ्या संस्थाना मोकाट सोडले आहे. त्याचा फायदा तेथील कंपन्या, आणि ज्यांची या आर्थिक उलाढालींवर पकड आहे, असे लोक घेताहेत.

म्हणून, या विधेयकात आर्थिक समानतेचे मुद्दे हवेत आणि सर्वात तळागाळातील लोकांना याचा फायदा मिळेल अशा तरतूदी असणे अतिशय महत्त्वाचे आहे. या गोष्टींचा त्यात समावेश न करणे म्हणजे नफेखोरीला उत्तेजन देणे असाच होतो.

३) नाबार्ड मुख्य नियंत्रक बनणे किती योग्य?

बिलाच्या मसुद्यामध्ये नाबार्डला मुख्य नियंत्रक बनवले आहे. खरे पाहिले तर नाबार्ड ही एक स्वत: स्वयंसाहाय्य गट (एसएचजी) तयार करणारी प्रमुख संस्था आहे. तिला जर नियंत्रक बनवले तर व्यवहारात विसंगती तयार होईल. आणि मूळात हे पाहायला हवे की, नाबार्ड ही संस्था गरीब महिलांपर्यंत खरोखरी किती पोहोचली आहे!

मसुद्यामध्ये नाबार्डला जे जास्त अधिकार देण्यात आले आहेत, हे लक्षात घेता खालील परिणाम होतील -

(अ) मसुद्यात असे सांगितले आहे की, बचतगटांना नाबार्डमध्येच नोंदणी करावी लागेल. यामुळे नाबार्डची मक्तेदारी निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

(ब) संस्थांना वेगवेगळ्या प्रकारची द्यावयाची सूट आणि कोणत्या संस्थांना जाचक अटी लादायच्या याबाबतचे अधिकारही नाबार्डला दिले आहेत. यामधून भ्रष्टाचार बोकाळेल आणि एकीकडे नाबार्ड व काही स्वयंसेवी संस्था यांचे साटेलोटे होण्याची, तर दुसरीकडे, नाबार्ड व अन्य संघटना यामधील संबंध बिघडण्याची शक्यता आहे.

(क) नाबार्डचे कार्यक्षेत्र खरेतर ग्रामीण भागापुरते मर्यादित आहे. असे असले तरी या मसुद्यात शहरी विभागांतील बचत गटांना नियंत्रित ठेवण्याचे अधिकार सुद्धा नाबार्डकडेच देण्यात आले आहेत. हे कितपत योग्य आहे? म्हणून, नियंत्रण, नोंदणी, तपासणी व मूल्यांकनाचे अधिकार हे अशा एका स्वायत्त संस्थेला द्यावेत जी अशा प्रकारच्या व्यवहारात गुंतलेली नाही, किंवा देशपातळीवरील संस्थांच्या प्रतिनिधींना घेऊन एक स्वायत्त मंडळ बनवावे व त्याच्या हातात ही सूत्रे द्यावीत.

४) महिलांच्या हिताची अवहेलना

(अ) आज आपल्या देशात १५ कोटीपेक्षा जास्त महिला बचतगटात संघटित झाल्या आहेत, लघुवित्त संस्थांच्या त्या मूळ आधार आहेत. नुसते गट तयार करून महिला थांबल्या नाहीत तर त्यांनी महासंघ बनवले. या विविध महासंघांनीच आजपर्यंत स्वायत्त पद्धती निर्माण केली व त्यामुळे इतर आर्थिक व्यवस्थेच्या दुष्परिणामापासून त्या स्वत:ला काही प्रमाणात वाचवू शकल्या. परंतु या महासंघांबाबत मसुदा काहीच बोलत नाही. उलट महिलांच्या मेहनतीतून निर्माण झालेल्या छोट्या-छोट्या बचतीला केवळ बँक व्यवस्थेच्या दावणीला बांधण्याचा धोकादायक विचार यात दिसतो. त्यामुळे महिला त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवल्या जातील आणि बचत गटांची स्वायत्तता दडपली जाईल.

याची नोंद घेताना, महिलांच्या अशा महासंघांना वित्त पुरवठा करण्यासाठी विधेयकात विशेष प्राधान्य दिले जाणे आवश्यक वाटते.

(ब) 'लघुवित्त विकास मंडळा'मध्ये नाममात्र २ महिलांना सदस्यत्व दिले जाणार आहे. बचत गटांमध्ये १५ कोटी महिला असताना या दोन सदस्यांचे नामांकन देखील नाबार्ड वर सोपवले आहे. ज्या महिलांनी अनेक अडचणींना तोंड देऊन महासंघ तयार केले आहेत आणि ज्या महिला बचत गटांच्या आंदोलनाच्या प्रमुख आहेत त्यांना या मंडळावर स्थान देण्याऐवजी नोकरदार व बँक कर्मचारी यांना बहुतांश स्थानावर घेण्यात आले आहे. याचा अर्थ विधेयक तयार करणाऱ्यांना महिलांच्या संदर्भात कसलेच स्वारस्य नाही हे उघड होते. आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे, महिलांसाठी बनवलेल्या महिला राष्ट्रीय कोषाच्या प्रतिनिधिलादेखील प्रस्तावित मंडळात स्थान नाही.

म्हणून अशा स्वावलंबी महासंघाना स्वायत्तता देणे, त्यातील महिलांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना या नियंत्रण करणाऱ्या व निर्णय घेणाऱ्या अशा विविध

मंडळावर (लघुवित्त विकास मंडळासहित) आणि यंत्रणांवर समान प्रतिनिधित्व मिळावे अशी आपली मागणी आहे.

(क) स्वावलंबी विकास प्रक्रिया आणि सामाजिक बदल या संदर्भात हे विधेयक साहाय्यक ठरेल की घातक? या दृष्टीने याकडे पाहायचे झाले तर या विधेयकात केवळ 'अर्थवादी' भूमिका घेतलेली दिसते, तीसुध्दा मर्यादित. खरतर यासाठी सरकारने पणन संस्था, प्रशिक्षण संस्था उभ्या करायला हव्यात. सरकारी - निमसरकारी वित्तसंस्थांच्या माध्यमातून या गटांना योग्य अनुदान व पुरेसे माफक दराने कर्ज मिळण्याची, तेही कन्सेशनल लोन किंवा सॉफ्ट लोन दिली जावीत, अशी तरतूद विधेयकात हवी. असे झाले तर महिला आर्थिकदृष्ट्या आत्ताच्या एक पाऊल पुढे टाकू शकतील.

(ड) महिलांसंबंधी अन्य मुद्यांचा, त्यांच्या इतर प्रश्नांबाबत तसेच एक नागरिक या नात्याने त्यांची जडणघडण, त्यांच्याशी संबंधीत विषयावर शेती-जमीन-पाणी-ऊर्जा व आरोग्य-शिक्षण इ. विषयाचे तांत्रिक प्रशिक्षण, माहिती याची बचत गटाची नोंदणीशी विधेयकात सांगड घालायल हवी. तरच त्या पुढे येतील आणि त्यांचे सक्षमीकरण होईल. आणि महिला आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर एकूणच स्वावलंबी होतील. शिवाय त्यांचा आत्मविश्वास वाढेल, समाजात त्यांचे स्थान उंचावेल. पंचायत राज व्यवस्थेत त्या अधिक क्रियाशील होतील. असा समग्र दृष्टिकोन विधेयकाने ठेवला तर ग्राम पंचायत, तालुका-जिल्हा पातळीवर विविध सोसायट्यांमध्ये जी सावकारशाही चालते, त्यातून त्या मुक्त होतील. परंतु त्यासाठी हवा कायद्याचा आधार. त्यातूनच गाव पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढेल. परिणामी कुटुंबाला व गावाच्या विकासालादेखील यातून गती मिळेल. तसेच सामाजिक विकास व राजकीय जागृती या आधारे तयार होणाऱ्या महिला आर्थिक व्यवहारही अधिक समर्थपणे हाताळतील, आणि बचत गट एक आर्थिक चळवळ म्हणूनही त्या यशस्वी करू शकतील.

हा कायदा अशा पध्दतीने वित्त पुरवठा करणाऱ्या पतसंस्था वा इतर सोसायट्यांना लागू करावा, त्यामध्ये कर्जाच्या व्याजदरावर निर्बंध असतील. बचत गटांना फक्त कर्जाच्या दावणीला जुंपले जाते का त्यांना विविध प्रशिक्षण देऊन उभे केले जाते, हेही नोंदणीच्या निकषाचा भाग बनवावे.

५) स्वयंसेवी संस्था - सेवा की नफा?

मसुद्यामध्ये संस्थांनी बँकींग व्यवस्थेशी जोडून घ्यावे असे म्हटले आहे. बँकीग व्यवस्थेशी जोडणे म्हणजे केवळ आर्थिक व्यवहाराच्या जाळ्यात ओढणे. अन मग व्याजाचा विचार करून व त्याची परतफेड कशी करायची, त्यासाठी तारण काय ठेवून घ्यायचे याचीच चर्चा सुरू होईल. त्याच प्रमाणे जे प्रशिक्षण द्यायचे ते देखील 'संस्थेच्या उत्तेजनार्थ' (पहा कलम २० (जी). म्हणजे प्रत्यक्ष बचत करणाऱ्या गरीब महिलांना त्याचा फायदा न होता गट एकत्रित करणाऱ्या 'संस्थांना' त्याचा फायदा होईल. याचा अर्थ व्याजाचा हिस्सा संस्थेला गेला तर जी रक्कम गटाकडे जमा होईल त्याचा त्या समूहाला कोणत्याही संकटाचा मुकाबला करण्यासाठी किंवा व्यक्तिगत पातळीवर ही रक्कम अंतर्गत देवघेवी करीता शिल्लक राहणार नाही. अशा प्रकारे स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या सेवा करण्याच्या उद्देशापासून दूर लोटले जाईल. परंतु गटांना एकत्रित करणाऱ्या 'संस्थांना' मात्र व्याजाचा हिस्सा पण मिळेल. अन मग यातील बहुतांश संस्था एकप्रकारे गरिबांच्या ठेवी नियंत्रित करतील आणि हे स्पष्ट आहे, की त्या पैशाचे नियंत्रण स्वत:ला फायदा करून घेण्याच्या इच्छेनेच करतील.

विधेयकातील एक कलम असे ही सांगते की प्रशिक्षण द्यायचेच तर ते 'ग्राहक शिक्षणासाठी'. याचा अर्थ स्पष्ट आहे की गरिबांची क्रयशक्ती थोडी वाढवायची आणि त्यांना मुक्त बाजारपेठेतील ग्राहक बनवायचे. म्हणजे एकीकडे या क्षेत्रात येणाऱ्या कंपन्यांना किंवा त्यांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या संस्थांना (५ लाख रुपये जमा असणाऱ्या संस्था).नोंदणी करण्याचा अधिकार दिला जाणार! आणि गरीब, कष्टकरी, हातावर पोट असणाऱ्या महिलांना कंपन्यांचे ग्राहक पण याच कंपन्यांचे बनवणार! कोणत्याही पध्दतीने पाहिले तरी लोकांच्या जवळचा पैसा आणि निर्णयाचे अधिकार काढून घेण्याचा हा डाव ठरणार.

अशा प्रकारे मसुद्याच्या आधारे जिच्याजवळ ५ लाख रुपये ठेव जमा असेल अशी कोणतीही संस्थां लोकांकडून बचत जमा करण्यासाठी जाहिरात देऊ शकतात. याचा अर्थ कोणताही गैरकारभार करणाऱ्या संस्थां अशा प्रकारे पुढे येऊ शकतात. म्हणून स्वयंसेवी संस्थांना अशा प्रकारे बचत जमा करण्याचा अधिकार देणे, हे पूर्णपणे चुकीचे आहे. मसुद्यामध्ये एक अशी तरतूद आहे की, दरवर्षी १५% नफा राखीव निधी म्हणून जमा करता येईल. तो सुरक्षित स्वरूपात ठेवला जाईल. पण अशा तरतुदींमुळे स्वयंसेवी संस्थांमध्ये 'सेवाभाव'च्या ऐवजी नफा मिळवणे हीच

भावना वाढीस लागण्याचा धोका आहे, त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार महिलांना व बचत गटांना मिळणे आवश्यक आहे.

असे, केवळ नफ्याचा विचार करणारे सर्व निकष विधेयकातून काढून टाकावेत असा आपण आग्रह धरायला हवा.

बचत गट ही खरोखरी जन चळवळ बनवायची तर तातडीने काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे -

(१) विधेयक बदलांसह यावे की ते फेटाळले जावे याचे मंथन सर्व थरात होण्यासाठी विधेयकाबाबत जागृती करण्याची गरज आहे.

(२) मोठ्या, भ्रष्ट संस्थांच्या धंज्यात व बाजारपेठेवरील पकडीत गटांनी अडकू नये यासाठी आपल्या व परिसरातील इतरही गटांचे बचत, उत्पादन, वितरण, प्रशिक्षण हे व्यवहार उद्दिष्टांनुसार होताहेत ना हे प्रत्येकाने पाहण्याची गरज आहे.

(३) स्थानिक पातळीवर विविध अधिकारांसाठी - शिक्षण-आरोग्य-ग्रामसभा/ग्रामपंचायत-जमीन-पाणी-सहकारी संस्था आदि बाबतीत क्रियाशील होण्याची गरज आहे. यासाठी एकत्र येऊन, माहिती व ज्ञानाच्या आधारे पुढे पाऊल टाकण्याची गरज आहे.

(४) महिलांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणाऱ्या स्त्री भ्रुणहत्ये पासून ते स्वावलंबना पर्यंतची लढाई महिलांना करावी लागणार आहे. समाजात समान स्थान व संधी मिळावी यासाठी विविध प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करण्याची गरज आहे. त्यासाठी बचत गटातील महिलांचे नाते महिला संघटना आणि स्त्री-चळवळीशी जोडण्याची गरज आहे.

(५) तसेच गावांना वा शहरांना जागतिकीकरणाच्या विळख्यात खेचणाऱ्या धोरणांविरोधात अन्य चळवळींशी (शेतकरी, शेतमजूर वा असंघटित कष्टकरी जनता, कामगार-कर्मचारी) आपले नाते प्रस्थापित करण्याची, एका व्यापक एकजुटीची देखील गरज आहे.

चला तर स्त्री-पुरूषानी एकत्र येऊन एका समृध्द, शांततामय समाज उभारूया. एका विज्ञानाधिष्ठीत नव्या संस्कृतीची पुनर्रचना करू या. आणि मानव मुक्तीच्या लढाईत सामील होऊ या.

- अंजना टकले/विनया मालती हरी

❑

आमची आगामी प्रकाशने

समता विज्ञान आंदोलन, (हस्तपुस्तिका) भाग १

समता विज्ञान आंदोलन, (हस्तपुस्तिका) भाग २

माझी जमीन पिकेल कशी?

परसबागेतील शेती

किडनाशकांना पर्याय

जनुकाची गोष्ट

डॉक्टर रखमाबाई

लोकनायक : तंट्या भिल्ल

शाहूंच्या आठवणी



तोड ही चाकोरी

तोड बाई तोड ही चाकोरी
तोड मर्दा तोड ही चाकोरी
तोड तोड तोड तोड, तोड ही चाकोरी
मुक्तीचं गीत म्हणा, रात हाय अंधारी ॥धृ.॥

गावापासून आपल्या शहरापातूर
बायकोपासून आपल्या पोरापातूर
सर्वांना मातीशी इमान हाय गं
तरी बी चूल का गुमान हाय गं ॥१॥

कुणाची शेतं नी कुणाची भातं
आपण जात्यात तर हे हसत्यात सुपातं
सुपातलं जात्यात जाणार हाय रं
इतिहास खोटं कधी बोलणार नाय रं ॥२॥

सूर्याचा प्रकाश सर्वा समान
धरणीच्या पोटातलं पाणी समान
फिरणारा वारा सर्वा समान हाय गं
जमीन का सर्वांना समान नाय गं? ॥३॥

दिल्लीच्या वाटंला कुपानं हाय रं
संसद नावाचं दुकानं हाय रं
स्वातंत्र्य - स्वातंत्र्य कशात हाय गं?
रोटी मागंल त्याला बंदूक हाय गं ॥४॥

पिढ्यान् - पिढ्याचं वझं पाठणी
आजवर गायल्यात आसवांची गाणी
सुखाचं गाणं गड्या फुलणार हाय रं
रातीत मशाल पेटवायची हाय रं ॥५॥

आजच मशाल पेटवायची हाय रं ..
आताच मशाल पेटवायची हाय रं ...

संभाजी भगत